MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड / प्रतिनिधी

गत अनेक वर्षापासून पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी लढा देणारे राहुल दुबाले यांची महाराष्ट्र शासन गृह विभाग पोलीस निराकरण समन्वय समितीच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. राहुल दुबाले हे गत अनेक वर्षापासून पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी व कुटुंबासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत त्यांनी अनेक लढे उभारले पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी व न्याय हक्काच्या मागण्यासाठी त्यांनी संघटना उभी करून अनेक कुटुंबांना न्याय मिळवून दिलेला आहे. गृह विभागात त्यांच्या या कार्याचा फायदा व्हावा यासाठी गृहमंत्री तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र शासन गृह विभाग पोलीस निराकरण समन्वय समितीच्या सदस्य पदी राहुल दुबाले यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे गृह विभागातील कर्मचारी व त्यांच्या कुटुंबासाठी त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा होणार आहे राहुल दुबाले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३१० | शुक्रवार दि.०२ ऑगस्ट २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -310 | FRIDAY DT.02 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी १८०० कोटीच्या बीड जिल्ह्यातील जलजीवनच्या कामावर कधी बोलणार असा प्रश्न बीड जिल्ह्यातील जनतेला पडला आहे?








- एक हजार आठशे कोटीच्या बीड जिल्ह्यातील जलजीवन मध्ये राजकीय चोरांची चांदी.?
- पालकमंत्री धनंजय मुंडे यांना बीड जिल्ह्यातील जलजीवन चा घोटाळा माहित नाही का?
- बीड जिल्ह्यातील जल जीवन च्या कामांमध्ये अनेक राजकीय नेते महायुती महाविकास आघाडी च्या मंत्र्यांचे आमदारांचे कार्यकर्ते?
- लाड गेले आंधळे आले?
  संबंधित कंट्रक्शन च्या प्रत्येक बीड जिल्ह्यातील कामासंदर्भात नावानिशी तक्रारी असताना व संबंधित कंट्रक्शनच्या नाव काळे यांनी यादी टाकण्याची मागणी करत असताना तक्रारदाराची कुठलीही म्हणणे ऐकून घेत नाही येत नसून संबंधित कंट्रक्शन चे नाव संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीमध्ये असताना सुद्धा त्याच्यावरती का कारवाई केली नाही जिल्हा परिषद जल जीवन मिशन अंतर्गत असलेले कामांमध्ये अधिकारी कर्मचारी हे संबंधित कंट्रक्शनला पाठीशी घालून बसल्यावर पैसा दडपून आर्थिक तडजोड करून त्या कंट्रक्शनला चांगल्या कामाची पावती देण्यामध्ये जलजीवन चे लाड केले आणि आंधळे आले अशी सध्या पाहायला मिळत आहेत?
- जलजीवनच्या टक्केवारीच्या घोळामध्ये लाड गेले आंधळे आले.?
  गोपाळपूरच्या तीन कोटी ९० लाख ३४ हजार ९०० रुपयांच्या कामात मोठा घपळा?
- गोपाळपूरच्या जलजीवन मध्ये भ्रष्टाचाराचा नंगानाच अधिकाऱ्यांसमोर तरी अधिकारी म्हणतात यामध्ये काम चांगलंच झाले?
- गोपाळपूरच्या जलजीवांचे पुरावे गल्लीपासून दिल्लीपर्यंत तरीपण म्हणतात काम चांगलंच अधिकाऱ्यांची आर्थिक तळजळीत गुत्तेदारांशी संगमत?
  जल जीवन म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी राजकीय नेत्यांसह अधिकाऱ्यांची चांदीच चांदी?
  जलजीवनचे अधिकारी गुत्तेदाराच्या मर्जीप्रमाणे देऊ लागले चांगल्या कामाची पावती?
  तक्रार असतानाही दे की अदा का केली याची सखोल चौकशी होणे गरजेचे?
  प्रत्येक जलजीवांच्या कामांमध्ये ज्या त्या गावच्या लोकांची बोंबाबोंब?
  राजकीय नेत्यांनी १८०० कोटीची जलजीवनवर केली फसत?
  गोपाळपूरच्या जलजीवन मिशनमध्ये कोट्यावधीचा घोटाळा राजकीय चोरांची चांदी?
  बाळ सराफच्या तक्रारीने प्रशासन जागे कधी होणार?
  गोपाळपूरच्या जलजीवन चे काम मुळे राजकीय नेत्यांचे फोन जिल्हा परिषद जलजीवनच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना दबाव?
  बीड जिल्ह्यातील जलजीवन च्या प्रत्येक कामामध्ये भ्रष्टाचार गोपाळपूर जलजिवन प्रकरणी..
  विशाल सराफ यांच्या तक्रारीवर आयोगाने गुन्हा दाखल केला.!
  १३ आगस्ट पासून आमरण उपोषण करणार-विशाल सराफ

## जलजीवनचे अधिकारी माया जमविण्याच्या 'लाडा'त 'आंधळे' झाले

बीड जिल्ह्यातील १८०० कोटीच्या जलजीवन मध्ये पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी लक्ष घालणं गरजेचे आहे जलजीवन मध्ये कोट्यावधी रूपाचाअपहार करून बीड जिल्ह्यामध्ये भर पावसाळ्यात सुद्धा पाण्या वाचून बीड जिल्ह्यातील जनतेला वनवून भटकावे लागत आहे ग्रामीण भागातील जलजीवांचे अनेक काम यामध्ये बीड जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात येणाऱ्या जलजीवांची अठराशे कोटी रुपयांचा निधीच्या संदर्भात पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मात्र यावेळी फक्त वीर शहरातील पाणीपुरवठ्याच्या कामाकडे लक्ष घातले आहे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी गरज आहे.?

बीड प्रतिनिधी - बीड जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनेमध्ये रूपाचा भ्रष्टाचार चालू असताना प्रामुख्याने पाहिले तर बीड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठ्याचे काम या अगोदर झालेले आहेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या माध्यमातून अनेक काम यावेळी झालेले आहेत परंतु आज सुद्धा बीड जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशनमध्ये रूपाचा भ्रष्टाचार उघड्याने बीड जिल्ह्यातील जनता पाहत आहे हा जनता पाहत असताना मात्र दहा निरी जनता ही कुणालाच दिसत नाही का असा प्रश्न निर्माण होत आहे बीड जिल्ह्यातील एलजीवनच्या १८०० कोटी रुपयांच्या कामाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या प्रश्नावरती शब्द काढावा अशी मागणी बीड जिल्ह्यातील जनतेकडून करण्यात येत आहे तर यावेळी भारुड तालुक्यातील गोपाळपूरच्या जलजीवन मध्ये भ्रष्टाचार केला असून यामध्ये सामाजिक कार्यकर्ते ने तक्रार करून सुद्धा याची कुणी दखल घेत नाही पालकमंत्री धनंजय मुंडे हे जल जीवन मिशनच्या १८०० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार संदर्भात कधी बोलणार आहेत याची वाट बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनता पाहत आहे..

किल्ले धारूर /प्रतिनिधी

किल्लेधारूर तालुक्यातील

मौजे गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन योजनेचे काम गेल्या एक वर्षापासून सुरू आहे, एक वर्ष लोटले तरी अद्यापपर्यंत हे काम पूर्णत्वाकडे गेलेले नाही.तरी संबंधित अधिकारी यांनी धावते दोन बील काढून गुत्तेदाराला पोसायचे काम केले आहे.?तरी अधिकार्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी,गोपाळपूर जलजिवनच्या संबंधित इंजिनियर, गुत्तेदारावर शासनाची फसवणुक केल्यामुळे फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा,बोगस कामाचे अदा केलेले बिल संबंधीत गुत्तेदार यांच्याकडून शासनानी तात्काळ परत घेण्यात यावे,धारुर तालुक्यातील गोपाळपुर जल जिवन संबंधीत अधिकारी यांना तडकाफडकीने निलंबीत करावे यासह अनेक मागणी जिल्हाधिकारी, आयोगाकडे केली आहे.या योजनेत मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे.हा भष्टाचार उघडा पाडण्यासाठी १९ जून रोजी उपोषण करणार आले,दहा दिवसांच्या लेखी आश्वासनानंतर चौकशी करून मागण्या मान्य करण्याचे आश्वासन देण्यात आले, परंतु चौकशी झाली अधिकाऱ्याने गुतेदाराशी हातमिळवणी?करून खोटा अहवाल देण्यात आल्याने विशाल सराफ यांनी थेट आता माणवी हक्क आयोगाचे दरवाजे वाजले आहेत.विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी मुख्यकार्यकारी, पाणीपुरवठा मंत्री,यांना तक्रार देऊन, आंदोलन उपोषण करून ही योग्य न्याय भेटत नसल्यामुळे विशाल सराफ यांनी पुराव्यानिशी माणवी हक्क आयोगात तक्रार दाखल केली आहे .सराफ यांनी यांच्या तक्रारीवर आयोगाने गुन्हा दाखल केला आहे. प्रश्न मार्गी लावण्यासाठी १३ आगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे विशाल सराफ यांनी जिल्हाधिकारी यांना दिला आहे.

बोगस कामाचे अदा केलेले बिल संबंधीत गत्तेदाराकडून तात्काळ परत घेण्यात यावे

१) गोपाळपूर जलजिवनचे देयके अदा न करण्यात यावे.२) गोपाळपुर जल जिवन काम पूर्ण नसताना संबंधीत अधिकाऱ्याने धावते देयके अदा केले असुन त्यांची चौकशी करुन निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.३) गोपाळपूर जलजिवनच्या संबंधित इंजिनियर, गुत्तेदारावर शासनाची फसवणुक केल्यामुळे फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा.४) संबंधित कंट्रक्शन चे शासकीय लायसन रद्द करण्यात यावे,५) गोपाळपूर जलजिवनची पाईपलाईन इस्टिमेट प्रमाणे नसून एक मिटर खोलीकरण नसल्यामुळे संपूर्ण पाईपलाईन खोदून दाखवण्यात यावे.६) गोपाळपुर ग्रामपंचायत अंतर्गत जलजिवन मिशन योजनेचे संपूर्ण काम बोगस असल्यामुळे तात्काळ काम बंद करण्यात यावे.७) धारुर तालुक्यातील गोपाळपुर जल जिवन संबंधीत अधिकारी यांना तडपा तडपी निलंबीत करावे. ८) बोगस कामाचे अदा केलेले बिल संबंधीत गत्तेदार यांच्याकडून शासनानी तात्काळ परत घेण्यात यावे, अशी मागणी विशाल सराफ यांनी माणवी हक्क आयोग, तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे मांडल्या आहेत.

विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी, पाणीपुरवठा मंत्री,यांना तक्रार देऊन, आंदोलन उपोषण करून ही योग्य न्याय भेटत नसल्यामुळे विशाल सराफ यांनी पुराव्यानिशी मानवी हक्क आयोगात तक्रार दाखल केली आहे .सराफाच्या तक्रारीवर आयोगाने गुन्हा दाखल केला आहे.

# रामकृष्ण बांगर शासनाचे जावई आहेत काय? शिक्षणाधिकाऱ्यांचे होतेय 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष

## शाळांमध्ये कसल्याही सुविधा नसताना शिक्षण विभागाकडून कारवाई नाही

प्रतिनिधी । बीड

प्रगती आणि निवनिर्माण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भागात शाळांचे जाळे पसरवून विद्यार्थ्यांना पत्र्याचे शेड, स्वच्छतागृहपासून वंचित ठेवत सध्या मूलभूत सुविधा ही मिळत नसल्याने या दोन संस्थेवर प्रशासक आणण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला नेत्या रेखा फड यांनी केली होती. मात्र एवढं सर्व घडूनही आणि शिक्षण विभागाच्या तपासणीतून संस्थेच्या ढिसाळ कारभाराची माहिती समोर आल्यानंतर ही या संस्थेवर प्रशासक राज येतं नसल्याने रामकृष्ण बांगर हे शासनाचे जावई आहेत की काय असा सवाल आता उपस्थितीत केला जाऊ लागला आहे.

प्रगती शिक्षण प्रसारक मंडळ बीड व नवनिर्माण शिक्षण प्रसारक मंडळ (भायाळा ता. पाटोदा जि. बीड) या संस्थेचा अनागोंदी कारभारविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती.या संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी अजिबात सुविधा अस्तित्वात नाहीत. बऱ्याच ठिकाणी तर शाळेची इमारत बांधण्यासाठी निधी मिळालेला असतांना संस्थाचालकांनी निधी खिशात घालून तेथील विद्यार्थ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये ज्ञानार्जन दिले जात असल्याचे कळते. कोणतीही शिक्षण संस्था स्थापन करताना त्याला शासनाच्या नियमांच्या अधिन राहून संस्था चालवाव्या लागतात. पण प्रगती शिक्षण संस्था मात्र शासनाच्या नियम, अटी, शर्थी आणि कोणत्याही क्टनुसार चालत नाहीत.या शिक्षण संस्थेने या सगळ्या नियमांना तिलांजली दिलेली आहे. काही ठिकाणी उघड्यावर शाळा भरते, तर काही ठिकाणी विध्यार्थ्यांना वर्गात बसायला बेंच नाहीत. पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरत असल्यामुळे पावसाळ्यात विद्यार्थ्यांना मोठया अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुलींना स्पेशल बाथरूम, सुसज्ज असे स्वच्छतागृह, वॉशरूम अशा अनेक सुविधा या प्रगती शिक्षण प्रसारक मंडळ बीड व नवनिर्माण शिक्षण प्रसारक मंडळ (भायाळा) या संस्थेत आढळून येत नसल्याने तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार शिक्षण विभागाने



तपासणी मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. मात्र तरीही यात अद्याप ठोस कारवाई होतं नसल्याने रामकृष्ण बांगर आणि सत्यभामा बांगर शासनाचे जावई आहेत की काय? असा सवाल आता उपस्थितीत केला जाऊ लागला आहे.

तत्कालीन सीईओ अजित पवार यांनी लावलेली चौकशीही थांबली -संस्थाचालक रामकृष्ण बांगर यांचे सुपुत्र बाळा बांगर यांनी बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्यावर घोटाळ्याचा आरोप करत जलजीवन मिशनच्या कामांची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यानंतर अजित पवार यांनी आक्रमक पवित्रा घेत शिक्षण विभागाला संस्थांची कसून चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यावेळी राजकीय दबावापोटी बांगर यांच्या शिक्षण संस्थांची चौकशी होऊ शकली नाही. त्यामुळे आताही चौकशी होणार की शिक्षण विभाग केवळ बघायची भूमिका घेणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांचे संस्थाचालकाशी लागेबांधे?

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांचे संस्थाचालकाशी लागेबांधे आहेत हे सर्वश्रुत आहे. कदाचित यामुळेच बांगर यांच्या शिक्षण संस्थांची चौकशी करण्यास अधिकारी पुढाकार घेत नसावेत, असा संशय निर्माण होत आहे. दरम्यान, एखाद्या सर्वसामान्य शिक्षण संस्था चालकाच्या संस्थेविरोधात तक्रार आल्यानंतर तातडीने दखल घेणारा शिक्षण विभाग आता राजकीय व्यक्तीच्या शिक्षण संस्थेची चौकशी करतील काय? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

# ग्रामपंचायत कार्यालय अंधापुरी घाट येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन!




बीड : बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली व ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने महापुरुषाला,अभिवादन करण्यात आले.प्रभावी लेखणीतून,अनमोल वाणीतून वंचितांच्या व्यथा प्रखरपणे मांडणारे,साहित्यिक, लेखक,समाजसुधारक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बुलंद आवाज लोकशाहीर साहित्यसम्राट डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती ग्रामपंचायत कार्यालय अंधापुरी घाट या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाचे वतीने तसेच गावकऱ्यांच्या वतीने व वाघमारे मित्र मंडळाच्या वतीने डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती निमित्त लोकशाहीराला अभिवादन करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच वाघमारे मित्र मंडळ उपस्थित होते.

# चौसाळा येथे लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



बीड (प्रतिनिधी)


बीड तालुक्यातील चौसाळा येथील राजर्षी शाहु नगर याठिकाणी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली प्रथमता भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्या शुभहस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रभावी लेखणीतुन ,अनमोल वाणीतुन वंचितांच्या व्यथा प्रखरपणे मांडणारे ,साहित्यीक ,लेखक,

समाजसुधारक,संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बुलंद आवाज लोकशाहीर साहीत्यसम्राट डॉ.आण्णाभाऊ साठे यांची जयंती शाहु नगर चौसाळा येथे अभिवादन सभा घेऊन साजरी करण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कपिल मस्के, उपाध्यक्ष रवी सोनवणे,सचिव लखन सोनवणे, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वपनील सोनवणे, शाहेद पठाण,वैभव सोनवणे,वायभट सर,करण परदेशी,शंकर सोनवणे,राहुल वाघमारे,जितीन काळे,सतिष रूपवते,प्रदीप कुलकर्णी,प्रकाश ढोकणे,नितीन काळे,सतिष वाघमारे,किशोर कुचेकर,दादा गायकवाड यांच्यासह समाज बांधव मोठया संख्येने उपस्थीत होते.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अ‍ॅड. शेख शफिक भाऊ यांचा दोन दिवसीय बीड जिल्हा दौरा

बीड (प्रतिनिधी)

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांच्या दोन दिवसीय बीड जिल्हा दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्या दरम्यान बीड जिल्ह्याच्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील व तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार बॅरिस्टर अल्हाज असदुद्दीन ओवैसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा मा. खासदार इम्तियाज जलील, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला यांच्या आदेशावरून व सूचनेनुसार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसंदर्भात बीड जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. दोन दिवसीय नियोजित दौरा ३ ऑगस्ट रोजी सुरू होणार आहे. यात प्रथम दुपारी १२:०० वाजता गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात बैठक होणार आहे. त्यानंतर



दुपारी ०२:०० वाजता माजलगाव तालुक्यातील पक्षाच्या कार्यालयात बैठक होणार आहे. त्यानंतर धारूर येथील शासकीय विश्रामगृहात दुपारी ०४:०० वाजता बैठक होणार आहे. यानंतर अंबाजोगाई व केज तालुक्यासाठी केज येथील शासकीय विश्रामगृहात संध्याकाळी ०५:०० वाजता बैठक होणार आहे. तर परळी तालुक्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुपारी ०२:०० वाजता पक्ष कार्यालय, मलिकपुरा, परळी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने संरक्षक कुंपण बांधुन वृक्षारोपण केले

लिंबागणेश (प्रतिनिधी)

जागतिक तापमान वाढीच्या दरासाठी बेसुमार वृक्षतोड हि फार मोठी समस्या बनली असुन तापमानाचे नियमन आणि पावसाला पोषक हवामान बनवण्यासाठी झाडे महवाची भुमिका बजावत असुन कोरोना कालावधीत झाडांचे महत्त्व काय असते हे सर्वांनी जाणले असल्याने प्रत्येकाने झाडे लाऊन झाडांचे संगोपन करणे गरजेचे असुन वृक्षारोपण काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करत आज दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षारोपण करण्यात आले. केवळ वृक्षारोपण नव्हे तर संगोपनासाठी वैद्यकीय अधिकारी रूपाली चिटकुलवार आणि त्यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील सहकारी यांनी स्वखर्चाने तारेचे संरक्षक कुंपण तयार करूनच वृक्षारोपण करण्यात




आले. यावेळी चिंच ,पिंपळ,आंबा, बदाम ,चिकु,गुलमोहर ,सिसम तसेच फुलझाडे लावण्यात आली.यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी लोखंडे, गर्जे, कंचार,उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.जाधव, डॉ.कोठावळे,डॉ.राऊत,आरोग्य सेविका गिरे, शिंदे,चौरे, क्षीरसागर, वीर,आरोग्य कर्मचारी वीर, कदम, गायकवाड,सापते लांडगे प्रयोग शाळा तंत्रज्ञ, दत्तात्रेय झोडगे वाहन चालक आणि परिचर सुरेश आवसरे वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होते.

लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी वृक्षारोपणाबरोबरच त्यांच्या संगोपनासाठी संरक्षक करणे आवश्यक असल्याने स्वतः २० हजार रुपये खर्चून तारेची संरक्षक कुंपण आणि लोखंडी गेट बसवले तसेच ईतर कर्मचाऱ्यांनी जवळपास ५००० रूपये खर्चून लागवडीसाठी वृक्षाची रोपे खरेदी केली. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुशोभिकरणात भर पडणार असुन या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स. रमेश गायकवाड, पत्रकार हरिओम क्षीरसागर आणि डॉ.गणेश ढवळे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपाली चिटकुलवार आणि कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# जि प प्रा शाळा कजबा विभाग येथे विद्यार्थ्यांना विवीध शैक्षणीक साहीत्याचे वितरण

किल्ले धारूर (रोहित फावडे)

धारूर शहरातील कजबा विभागातील जि प प्राथमीक शाळेत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमीत्त शविद्यार्थ्यांना विवीध शालेय साहीत्य वितरीत करण्यात आले. यावेळी बाल विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असा सांस्कृतीक कार्यक्रम सादर करून उपस्थीतखना मंत्रमुग्ध केले. येथील जि.प.प्रा.कसबा शाळेत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच शाळेतील आदर्श शिक्षक श्री.तानाजी लासूने याच्रा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी केंद्रप्रमुख सय्यद हाकिम तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार अनिल महाजन,प्रकाश काळे हे होते.प्रथम केंद्रप्रमुख श्री.सय्यद हाकिम ,दै.लोकमतचे पत्रकार श्री.अनिल महाजन, दै.सकाळचे बातमीदार श्री.प्रकाश काळे,प्रा.राम लोखंडे ,



बालविद्यार्थ्यांनी सदर केला बाहरदार सांस्कृतीक कार्यक्रम

मुख्याध्यापक श्री.शांतीनाथ मुंडे सह मुख्याध्यापक श्री.जालिंदर मुंडे यांच्या हस्ते लोकशाहीरअण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गायकवाड ताई,व कार्यक्रम अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचा सत्कार शाळेतील शिक्षकांच्या वतीने शाल, पुष्पहार व गुच्छ देवून करण्यात आला.तसेच आदर्श शिक्षक श्री.लासूनेसरांचा वाढदिवस मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पहार व गुच्छ देवून करण्यात आला.यावेळी वाढदिवसानिमीत्त लासूने यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्नेह भोजन व शाळेसाठी विद्यार्थ्यांना भाषण करण्यासाठी डायस व शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वह्या,पेन व उजळणी पुस्तके मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आले.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनीभाषणे व शानदार गीते लेझीमच्या तालावर सादर केली.तसेच पत्रकार अनिल महाजन यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाविषयी सविस्तर माहिती सांगितली व शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे व न्रत्य केल्याचे कौतुक केले.प्रा.राम लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.केंद्रप्रमुख हाकिम सरांनीही मी याच शाळेत शिक्षण घेतले व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी छान कार्यक्रम सादर केला असे सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.वसंत राठोड सरांनी केले.आभार मुख्याध्यापक श्री.जालिंदर मुंडे यांनी केले तसेच शाळेतील शिक्षक श्री. आशोक लोकरे,सिरसट ,दिवटे मॅडम यांची उपस्थिती होती.



# माजलगाव येथे वंचित मध्ये असंख्य ओबीसी बांधवांचा जाहीर प्रवेश - भारत तांगडे

बीड (प्रतिनिधी)

आरक्षण बचाव यात्रा प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्वाखाली मुंबई येथून सुरू झाली आहे. आरक्षण बचाव यात्रेच्या सातव्या दिवशी बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात आगमन झाले. माजलगाव व धारूर तालुक्यातील नागरिकांनी ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ५४ ओबीसी कार्यकर्ते व इतर ६८ कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडी मध्ये जाहीर प्रवेश केला त्यामध्ये एकुण - १२२ कार्यकर्ते बीड जिल्हा पूर्व व पश्चिम च्या प्रमुख जिल्हा पदाधिकारी यांच्या उपस्थितीत घेतला प्रवेश. पक्ष प्रवेशाचे नियोजन सनी गायसमूद्रे व मित्र परिवार.या प्रसंगी बीड जिल्हा उपाध्यक्ष पश्चिमचे भारत तांगडे, पुर्व विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे, जिल्हा संघटक प्रा.बळीराम सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश बचुटे,अण्णा साहेब मस्के,जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम विर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी जगतकर, तालुका संघटक लक्ष्मण जाधव यांच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेशाचा कार्यक्रम घेण्यात आला. आगामी काळात वंचित बहुजन आघाडी अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा पक्षप्रवेश सोहळा महत्त्वाचा ठरला आहे. या कार्यक्रमाला जिल्हा, तालुका, शहर व गाव पातळीवरील पदाधिकारी कार्यकर्तेमोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कष्टकरी उपेक्षितांचा हुंकार अण्णाभाऊंनी साहित्यातून मांडला.! नगरसेवक-अ‍ॅड विकास जोगदंड

बीड (प्रतिनिधी)

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठेनीं लिहिलेल्या कादंबऱ्या वास्तविक इतिहास आहे. त्यांनी जे पाहिले, तेच त्यांनी मांडले. वंचित उपेक्षितांचा स्वाभिमानी संघर्ष त्यांच्या लिखाणात दिसतो. म्हणुनच अण्णाभाऊंना ' कष्टकरी उपेक्षितांच्या साहित्याचे जनक' म्हणतात. सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहीरी करत त्यांनी आयुष्यभर वंचितांसाठी समाजप्रबोधन केले. जातीव्यवस्था आणि गरीबीमुळे ते शिक्षण घेऊ शकले नाही. मात्र अवघी दीड दिवसाची शाळा शिकुन अण्णाभाऊंनी साहित्य क्षेत्रात मात्र खूप मोठी झेप घेतली.

कष्टकरी उपेक्षितांचे स्वाभिमानी आणि संघर्षमय जिवन त्याकाळी अगदी पोटतिडकीने आणि तळमळीने जगासमोर मांडणारा असा महालेखक दुसरा कोणी नव्हता. लेखणी आणि प्रतिभेच्या बळावर त्यांनी अनेक पुस्तके लिहीली. सिद्धहस्त कादंबरीकार, लोकशाहीर म्हणून त्यांना साहित्य क्षेत्रात आजही मानाचे स्थान आहे.



त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला राज्य सरकारचा उत्कृष्ठ कांदबरीचा पुरस्कार मिळालेला आहे. यासोबतच त्यांच्या अनेक कांदबऱ्या प्रसिद्ध आहेत. एवढंच नाही तर त्यांचे साहित्य चौदा भारतीय भाषा आणि इंग्रजी, जर्मन, रशियन अशा अनेक परदेशी भाषेतही प्रसिद्ध आहे. अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांमधून जनजागृतीचे कार्य केले. त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अत्यंत मोलाचे योगदान असून अन्यायाचा प्रतिकार करत संघर्ष करा असे सांगत जग बदलं घालूनी घाव.. सांगून गेले मला भिमराव

असे ठणकावून सांगत आपल्या कथा-कादंबऱ्यातून शोषितांचा आक्रोश त्यांनी जगासमोर आणत

कष्टकरी उपेक्षितांचा हुंकार आपल्या साहित्यातून अण्णा भाऊंनी मांडला असल्याचे प्रतिपादन भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी भिम स्वराज्य सेनेच्या विभागीय कार्यालयात जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना अभिवादन पर बोलतांना केले यावेळी

भिम स्वराज्य सेनेचे जिल्हा समन्वयक, मंगेश जोगदंड, सचिन जाधव,गोविंद वाघमारे, आदर्शराजे जोगदंड साहिल गायकवाड, महादेव वंजारे गोरख जोगदंड,हिरामण गायकवाड बाळू जावळे,अजय जोगदंड, चंद्रकांत जोगदंड,किसन (तात्या) जोगदंड, राजू जोगदंड,लखन शिंदे,उज्वल कोरडे सह आदी उपस्थित होते

# फडवणीस यांचा कारभार म्हणजे आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय!

**बीड (प्रतिनिधी)**

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी राज्यातील महसूल कायद्यात बदल करत राज्यातील इनामी जमीन प्रकरणात मोठा निर्णय घेत इनामी जमीन मूळ मालकाला देण्याचा तुघलकी निर्णय घेतला आहे. राज्यातील हजारो एकर जमीन भूमाफियांना आंदण देण्याचे कटकारस्थान राज्य शासन करत आहे का? निवडणुकांच्या तोंडावर काही भूमाफियांना लाभ देण्याच्या उद्देशाने देवेंद्र फडवणीस यांनी इनामी जमीन वर्ग दोन मध्ये असणाऱ्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयाचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राज्य शासनाचा जाहीर निषेध करत हा निर्णय तात्काळ पाठीमागे**



**घेण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केला आहे.**

राज्यातील अबकारी नियमात बदल करत महसूल अंतर्गत मागील अनेक वर्षापासून विभागाकडे इनामी जमीन संदर्भात लाखो प्रकरण खीतपत पडलेले आहे. राज्यात अनेक ठिकाणी भू माफियांनी दर्गा मस्जिद व मंदिराच्या जागा बळकावलेल्या आहेत या विरोधात सर्वसामान्य नागरिकांनी थेट न्यायालयात धाव घेतलेली आहे. मात्र अचानक राज्य शासनाला बुद्धी सुचली व राज्यातील महसूल विभागातील कायद्यात बदल करत थेट वर्ग दोन जमीन वर्ग एक मध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला या निर्णयाच्या पाठीमागे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा सिंहाचा वाटा आहे दर्गा, मंदिर , मस्जिद यांना दान केलेल्या जागेवर भूमाफिया प्लॉटिंगच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये कमवणार आहेत. राज्य शासनाने महसूल नियमात बदल करत ५० टक्के शासनाला दिले जाणारी रक्कम पाच टक्क्यावर आणली आहे .देवेंद्र फडणवीस यांच्यावर कोणाचा दवाब आहे का याचाही तपास होणे आवश्यक आहे. राज्यात अनेक ठिकाणी राजकीय नेत्यांनी इनामी जमीन बळकावलेल्या आहेत त्यांची पाप झाकण्यासाठी फडवणीस यांनी हा नसता उद्योग केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या निर्णयाचा तीव्र विरोध करत आहे. राज्य शासनाने हा तुघलकी निर्णय पाठीमागे न घेतल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी प्रसिद्धी माध्यमातून सरकारला दिला आहे.

**महाराष्ट्रात येणार भू माफियांचे राज्य; मनसे तीव्र लढा उभा करणार - वर्षाताई जगदाळे**

# वाकनाथपुर येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच आलेल्या लाल परीचे विद्यार्थी आणि गावकऱ्यांच्या वतीने उत्साहात स्वागत

## वाहतूक निरीक्षक गणेश जगताप यांचे मोलाचे सहकार्य



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम व रुग्णांना फळ वाटप करण्यात आले सौ इंदिरा गांधी रुग्णालय भिवंडी शहर गुरुवार दिनांक १ ऑगस्ट रोजी दुपारी १२वाजता महात्मा ज्योतिबा फुले नगर१ मित्र मंडळ भिवंडी*आयोजक (तेजेस पाटेकर ऑल इंडिया पँथर सेना भिवंडी शहर युवा अध्यक्ष ) (विभाग प्रमुख ठझख पद्मा नगर अनिल अनिल दूनगव ) (भिवंडी शहर प्रवक्ता वंचित बहुजन आघाडी मिलिंद शिंद कार्यकर्ते .रोहन साळुंखे. सिद्धार्थ मस्के .अजय मगर .अनिल अहिरे. जय डोंगरे.अनुराधा मोडके

गेल्या अनेक महिन्यांपासून वाकनाथपुर ते म्हाळस जवळा या मार्ग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरु करण्याची मागणी सुरू होती वाकनाथपुर. रज्जाकपूर. कदम वस्ती या भागांतील विद्यार्थी म्हाळस जवळा येथील विद्यालयात शिक्षण घेत आहेत परंतु या मार्ग शाळेत जाण्यासाठी कोणतीही सुविधा नसल्याने या मार्ग बस सेवा सुरू करण्याची मागणी पत्रकार नवनाथ गोरे. उप सरपंच हनुमान खाकरे. विक्रम खाकरे. संजय कानडे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक गव्हाणे सर. डोळे सर. सह सर्व शिक्षक करत होते आणि तसेच वाहतूक निरीक्षक गणेश जगताप यांचा बस सुरू करण्यास मोलाचा वाटा आहे त्याच्या



सहकार्याने आज या सर्वांच्या मागणीला यश आले असुन विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरु करण्यात आली आहे ही बस सुरू झाल्याने सर्व विद्यार्थी आणि पालक वर्ग आनंदात आहे स्वातंत्र्यानंतर प्रथम वाकनाथपुर येथे लाल परी आल्याने लालपरीला हार नारळ फोडून तसेच वाहक आणि चालक यांना शाल हार आणि श्रीफळ देऊन विद्यार्थी आणि गावकऱ्यांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले या वेळी पत्रकार नवनाथ गोरे. उप सरपंच भागवत खाकरे. उप सरपंच हनुमान खाकरे. अंगणवाडी सेविका आशाताई राऊत .महादेव खाकरे. गणेश खाकरे.सोमनाथ गोरे. शेख अलिक . खाकरे महारुद्र. खाकरे बिबिसेन. शेख खदिर . ज्ञानोबा गोरे .सह सर्व गावकरी उपस्थित होते

# काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला दिला आधार


## किराणा, शालेय साहित्यासह मुलांचा पुढील शैक्षणिक खर्च करणार – गणेश बजगुडे पाटील

बीड (प्रतिनिधी)

नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी मागील काही दिवसापुर्वी कर्जबाजारी पणाला कंटाळुन जीवनयात्रा संपवलेल्या आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट देत किराणा, शैक्षणिक साहित्य वाटप करत मुलाच्या पुढील शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्वीकारली. राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे शेतकरी, शेतमजुर कर्जबाजारी होवुन आत्महत्या करत आहे तरी देखील कसल्याही प्रकारची शासकीय मदत त्या आत्महत्याग्रस्त



कुटुंबीयांना मिळत नाही ही अतिशय लाजिरवाणी बाब असुन वेगवेगळ्या गोंडस नावाने फसव्या योजनांच्या जाहिरातीत हे सरकार मोठ्या प्रमाणात खर्च करत असुन हा जनतेचा हक्काचा पैसा गोरगरिबांना मिळाला पाहिजे. निवडणुकीपुरतेच लोकांच्या दारोदार जाण्यापेक्षा अडचणीत त्यांना पाठबळ देणे गरजेचे आहे. गोरगरीब, निराधार, गरजवंताना निस्वार्थ मदत करण्याचे कार्य मी शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने नेहमीच करत आलेलो आहे. पुढील काळात देखील माझ्या शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने व काँग्रेस पक्षाच्या वतीने खासदार रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वात गरजवंताना मदत, निराधारांना आधार देण्याचे काम करत राहु असे गणेश दादा बजगुडे पाटील म्हणाले.



आपल्या कथा–कादंबऱ्यातून शोषितांचा आक्रोश मांडणारे,संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोलाचे योगदान देणारे लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील स्थित असलेल्या त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास भिम स्वराज्य सेनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले या प्रसंगी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड,जिल्हा समन्वयक, मंगेश जोगदंड, सचिन जाधव, आदर्शराजे जोगदंड, साहिल गायकवाड, महादेव वंजारे, गोरख जोगदंड, अनिल डोळस, अशोक वीर, बाळू जावळे, अजय जोगदंड, चंद्रकांत जोगदंड, किसन (तात्या) जोगदंड, वसंत (मामा) चांदणे हिरामण गायकवाड आदी सह मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित होते...

# आष्टी विधानसभा मतदारसंघात मतदारांची बोगस नोंदणी सुरू

आष्टी (प्रतिनिधी)

२३१अष्टी विधानसभा मतदारसंघात सत्ताधिकारी पक्षाकडून प्रशासनाच्या सहकार्याने निवडून येण्यासाठी आवश्यक मतदानाची बनावट कागदपत्राचे आधारे नवीन मतदाराचे नावे स्थानिक रहिवासी असलेल्या बाहेरील मतदानाची नावे समाविष्ट करण्याचे काम सुरू आहे लोकसभेच्या मतदानाची संख्या लक्षात घेऊन घेऊन हा गैरप्रकार सुरू आहे असे तिन्ही बाजूंनी अहमदनगर जिल्ह्याची सीमा आहे या लगतच्या गावात मतदान वाढवण्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न सुरू आहेत यापूर्वी आष्टी नगरपंचायत निवडणुकीत मतदार वाढवणे कार्यक्षेत्र व्हावे म्हणून त्यांना त्यामुळे त्यांना यश प्राप्त झाले हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रमांक ११४६/२०२२ संभाजीनगर येथे प्रलंबित आहे त्याची



पुनरावृत्ती होण्याची शक्यता असल्यामुळे सध्या गैरप्रकार रोखण्यासाठी या, राज्य निवडणूक आयोग यांना कळविण्यात यावे अशी विनंती आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे अध्यक्ष राम खाडे यांनी,( राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील ,(राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट )यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

# शिवसैनिकांनो, मला आमदार नाही तर बीडच्या जनतेला आमदार बनवण्यासाठी कामाला लागा- अनिलदादा जगताप

## शिवसेना कार्यालयात पदनियुक्ती तथा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न

बीड (प्रतिनिधी)

गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या कार्यपद्धतीला प्रभावित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. एकनाथ शिंदे साहेब आणि डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली शिवसेनेचे मार्गक्रमन यशस्वीपणे सुरु आहे. त्यामुळे आपल्याला जनतेच्या भल्यासाठी पक्ष संघटना मजबूत करून येणाऱ्या विधानसभेला आपले नेते शिंदे साहेब यांचे हात बळकट करावे लागणार आहेत तरच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भगवा फडकला जाईल असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, शिवसैनिकांनो, यंदा विधानसभेला मला आमदार बनवण्यासाठी नाही तर बीड मतदार संघातील प्रत्येक माणसाला आमदार बनवण्यासाठी आणि सामान्यांच्या घरात सत्ता पोहचवण्यासाठी दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करा. पूर्ण ताकदीने कामाला लागा, यंदाच्या निवडणुकीत अनिल जगताप नाही तर बीडचा सामान्य घरातला प्रत्येक माणूस आमदार झाला पाहिजे. असं वक्तव्य शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी शिवसेना पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळ्या दरम्यान केले.

काल दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळा पार पडला. यामध्ये नव्याने लखन जगताप यांचा शिवसेनेत प्रवेश घेण्यात आला. याबरोबरच विकास लांडगे- विभाग प्रमुख, रणजीत बुंदीले - विभाग प्रमुख, ऋषीकेश जोगदंड-शहर सहसंघटक, अक्षय काशिद-




उपशहर प्रमुख यांचा प्रवेश घेऊन नियुक्तीपत्र देत पदनियुक्ती करण्यात आली तर शिवसेना तालुका कार्यकारणीवर रजनीकांत उर्फ गणेश श्रीमंत मस्के- तालुका संघटक, ज्ञानेश्वर नागोराव ढास- तालुका सह सचिव, ढास दादासाहेब त्रिंबक - उपतालुका प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. याबरोबरच लिंबागणेश जि. प. सर्कलमधील ढवळे सुरेश दगडु - विभाग प्रमुख, सुर्वे सदाशिव उपविभागप्रमुख, जाधव अशोक श्रीपती - सर्कलप्रमुख, घोलप सुनिल रावसाहेब - सर्कलप्रमुख, वायभट कृष्णा मनोहर - उपसर्कलप्रमुख, वळे दत्ता ज्ञानोबा - उपसर्कल प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर पिंगळे यांनी केले तर सुनील सुरवसे जिल्हा संघटक बीड, संतोष जाधव उप जिल्हाप्रमुख, मकरंद उबाळे तालुका प्रमुख आणि गणेश मस्के तालुका संघटक बीड यांनी आपले मनोगत व्यक्त करत येत्या विधानसभेला पक्ष संघटना मजबुतीसाठी आणि मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू अशी ग्वाही दिली. अनिलदादा जगताप यांनी आपल्या अध्यक्षीय भाषानात शिवसैनिकांना संबोधित केले. बीड मतदार संघात काम करण्याचे दिशा धोरण ठरवून दिले. पक्ष संघटन वाढवण्यासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले आणि विधानसभाच नाहीतर येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला शिवसेनाचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांना पूर्ण ताकदीने काम करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी

# विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत , काळे सर

आष्टी (प्रतिनिधी)

आजचा विद्यार्थी हा उद्याच्या भविष्यातील एक मोठा सर्वसामान्य जनतेचा आधारस्तंभ आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत व आपण शालेय जीवन जगत असताना थोर महापुरुषांनी आजपर्यंत समाजासाठी काय केले याचे भान ठेवून त्यांच्या विचाराला स्मरून आपलं जीवन जगावं असे जीवन गरीब व दारिद्रित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी आपले जीवन घडवले अवघ्या दीड दिवस शाळेत जाऊन त्यांनी आतापर्यंत ३६ कादंबऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत त्यांचे विचार आपण डोळ्यासमोर ठेवून आपलं चारित्र्य घडवून असे मत शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे हनुमान विद्यालय घाटा पिंपरी येथील लोकशाहीर साहित्यरत्न




आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त ते बोलत होते साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस शाळेचे मुख्याध्यापक काळे एस बी यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेश पुष्प अर्पण केला तर उपस्थित मान्यवरांचे हस्ते लक्ष्मी पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक तांदळे सर यांनी केले या कार्यक्रमाला गोरे सर, साळुंखे सर ,तांदळे सर ,किरण धोंडे सर ,वायभासे आर एम सर ,शिपाई बाबासाहेब तळेकर घोडके पोपट ,कोमल गाडे मॅडम , कन्हेरकर सर, प्राध्यापक राऊत सर, सह शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन धोंडे सर यांनी मानले




अंभोरा पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे साहेब यांनी आपला वाढदिवस एकदम साध्या पद्धतीने साजरा करत गोमाता हि ईश्वर सेवा समजून अडीच टन हिरवा चारा देवळाली पानाची तालुका आष्टी येथे चैतन्यानद स्वामी गोशाळेत दिला तिथेच केक कापून आपला वाढदिवस साजरा केला या वाढदिवस चर्चा परिसरात चांगली रंगली छायाचित्र सुरेश कांबळे



**संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या वाढदिवस माजलगाव मधे विविध उपक्रमांनी साजरा**

संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य दिव्य रक्त शिबिर माजलगाव मधे घेण्यात आले शेकडो तरुण रक्तदान करण्यासाठी उपस्थित होते. सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिरास सुरुवात झाली असून सायंकाळी ७ वाजे पर्यंत रक्तदान करण्यात आले, तसेच जरांगे पाटील यांना दीर्घायुषी मिळावे म्हणून आज माजलगाव मूकबधिर शाळा येथे फळं वाटप व शालेय साहित्य वाटप करून वृक्ष लागवड करण्यात आली. सकल मराठा समाज माजलगाव शहाजी सोळंके,विजय दराडे, सिधू खराडे,तुकाराम नावडकर, अण्णासाहेब सोळंके,गणेश पाटेकर,गोपाळ,जोगदंड सह अनेक मराठा बांधव उपस्थित होते, सकल मराठा समाज माजलगाव यांच्या वतीने उपक्रम राबविण्यात आला.

# शेतीवरील कर्ज व जात प्रमाणपत्राला कंटाळून तरुणाची आत्महत्या

धारुर (प्रतिनिधी)

धारुर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील तरुण गणेश भागवत रुद्रे वय ३८ याने गेल्या वर्षीच्या दुष्काळामुळे शेतीच्या नापिकीमुळे रत्नसुंदर बँकेचे घेतलेल्या कर्जाचे हफ्ते भरण्याच्या चिंतेमुळे तसेच स्वतः च्या मुलांचे जात प्रमाणपत्र निघत नसल्यामुळे त्यांच्या भविष्याच्या काळजीमुळे दि.१९ रोजी शेतात कापूस फवारणीस आणलेले औषध प्यायले असता त्याचा लातूर येथे उपचार चालू असताना काल मृत्यू झाला आहे.

मराठवाड्यात गेल्यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली होती, त्यामुळे जमिनीतून म्हणावं तसे उत्पादन शेतकऱ्यांना मिळाले नाही. त्यातच पहाडी पारगाव येथील तरुण गणेश भागवत रुद्रे वय याने याने शेतीमध्ये काहीतरी नवीन करण्यासाठी आपल्या वडिलांच्या नावावर असलेल्या जमिनीवर रत्नसुंदर बँक माजलगावचे १० लक्ष रु कर्ज घेतले होते. परंतु गेल्या वर्षीच्या कमी पावसामुळे शेतामध्ये पीक म्हणावं तसे आलेच नाही, त्यामुळे बँकेचे हप्ते भरण्यास



अडचण येत होती. बँकेचे कर्मचारी हप्ता भरण्यासाठी सतत तगादा लावत होते. परंतु जवळ काहीच पैसे नसल्यामुळे गणेशला पैसे भरण्याची सतत चिंता मनात लागली होती. तसेच आपल्या दोन मुली व एका मुलाचे शिक्षण चांगले व्हावे म्हणून जात प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसीलमार्फत माजलगावच्या उपविभागीय कार्यालयात कोळी महादेव जातींचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केलेला होता. परंतु तेथील अधिकारी व कर्मचारी हे सतत चकरा मारून ही मुलांचे जात प्रमाणपत्र देत नव्हते, त्यामुळे त्याला आपल्या मुलांच्या भविष्यांची सतत काळजी वाटायची. कर्जाचे हफ्ते कसे भरू? व मुलांचे शिक्षण कसे करू? असे ते सतत म्हणत असायचे, यातच त्यांनी शेतात फवारीसाठी आणलेलं औषध पिले,असे त्याच्या पत्नीने सांगितले. त्याच्या पश्चात त्याची पत्नी छाया तसेंच धनश्री वय १२ वर्ष

# पालकमंत्र्यांकडून बीड शहरवासीयांची दिशाभूल- मा.आ.सय्यद सलीम


## बीड शहराच्या पाणी पुरवठा प्रकरणी हायकोर्टाचा आदेश डावलून राजकारण केले

बीड (प्रतिनिधी)

पाणी असुनही आणि पाणी पुरवठ्याची योजना पुर्ण होवूनही केवळ वीज बिलाच्या थकबाकीपोटी बीडकरांना पाणी मिळत नाही. त्यामुळे वीजबिल भरण्यासंदर्भात शासनस्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने माजी आ.सय्यद सलीम यांनी केंद्राच्या 'हर घर जल, हर घर नल' या महत्वकांक्षी अशा जलजीवन मिशनच्या योजनेला हायकोर्टात आव्हान देत याचिका दाखल केली होती. या प्रकरणामध्ये हायकोर्टाने ११ जून २०२४ रोजी, राज्याच्या नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना सर्व संबंधितांची बैठक दि.२९ जुलै रोजी घेण्याचे आदेशित केले होते. मात्र ही बैठक रद्द करून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ३१ जुलै रोजी व्ही.सी.द्वारे या मुद्यावर बैठक घेतली. मात्र या बैठकीत हायकोर्टाचा मुद्दा इतरत्र वळवत वांझोटी बैठक घेवून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाणी प्रश्नावर तीन लाख नागरीकांची दिशाभूल करत राजकारण केल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे.

बीडचे माजी आ.सय्यद सलीम यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या पाणी प्रश्नाच्या बैठकीवरून वस्तुस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. बीड नगर पालिकेकडे महावितरणची ३६ कोटी रूपयांची थकबाकी आहे. त्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी २५ एमएलटी क्षमता असलेली पाणी पुरवठा योजना मंजुर असुनही त्यास महावितरणकडून अतिरीक्त वीज कनेक्शन मिळत नाही. यामुळेच सध्या पाणी असुनही शहरात कुठे दहा - बारा दिवसाला तर कुठे पंधरा ते वीस दिवसाला पाणी पुरवठा होत आहे. सदरील मुद्यावरून माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहीत याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेची दखल घेवून न्यायालयाने दि.११ जुन २०२४ रोजी बीड नगर पालिकेकडील वीज बील थकबाकीच्या विषयावर नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना बैठक घेण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार ही बैठक दि.२९ जुलै २०२४ रोजी होणे नियोजीत होते. ही बैठक अचानक रद्द करून आ.संदीप क्षीरसागर आणि याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांना श्रेय जावू नये म्हणून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी हीच बैठक दि.३१ जुलै रोजी व्हिडीओ कॉन्फरंसींग द्वारे घेतली. या बैठकीतून निष्पन्न काहीच झाले नाही. केवळ इतरांना श्रेय नको म्हणून ओढून - ताणून ही बैठक घेण्यात आली. त्यातही जनहित याचिकेच्या अनुषंगाने हायकोर्टाने जे आदेश दिले आहेत. त्या आदेशाला बगल देवून ऐनवेळी विषय इतरत्र वळविण्यात आल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने या पाणी प्रश्नावर प्रस्ताव तयार करून तो केंद्रातून जलजीवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाला पाठवणे आवश्यक होते. मात्र दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे आश्वासन देण्यापलीकडे पालकमंत्र्यांनी या बैठकीत काहीच ठोस निर्णय घेतले नाहीत. हा विषय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्याचा नसुन प्रशासकीय स्तरावर संबंधीत विभागाच्या अधिकार्यांच्या उपस्थितीत बैठक घेवून त्याचा प्रस्ताव केंद्राच्या जलजिवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाकडे पाठवणे आवश्यक होते. परंतू केवळ राजकारण करायचे म्हणून जाणिवपूर्वक विषय इतरत्र वळवून बैठक घेण्यात आलेल्याचे माजी आ.सय्यद सलीम यांनी सांगितले.





### बीडकरांच्या पाणीप्रश्नाची एवढीच काळजी होती तर, जिल्हा नियोजन मधूनच विषय मार्गी लावला असता!

बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी थकीत वीजबिलाचा मुद्दा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दोन वेळा मांडला होता. जिल्हा नियोजन समिती किंवा शासनाने निधी उपलब्ध करून तो निधी थेट महावितरणकडे विजबिलापोटी वर्ग करून पाणी पुरवठ्याची रखडलेली योजना कार्यान्वीत करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली होती. एवढेच नव्हे तर राज्याच्या सभागृहातही त्यांनी हा मुद्दा उपस्थित करून लक्ष वेधून घेतले होते. बीडकरांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न किती महत्वाची आहे. या विषयी त्यांनी पोटतिडकीने आणि मुद्देसूद भुमिका मांडून या प्रश्नी शासनाने लक्ष घालण्याची विनंती केली होती. मात्र त्यावेळी पालकमंत्री म्हणून धनंजय मुंडे यांनी या मागणीची दखल का घेतली नाही ? त्यांना नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याची एवढीच काळजी होती तर हा विषय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतच मार्गी लावता आला असता. आता मात्र उसने अवसान आणून ओढून - ताणून बैठका घेत श्रेयासाठी त्यांची खटाटोप सुरू आहे.

### उच्च न्यायालयाच्या आदेशाला डावलून राजकारण करण्याचा प्रयत्न

बीड शहराच्या पाणी पुरवठा प्रश्नावर सत्ताधाऱ्यांची उदासीनता असल्याने माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. यावर दि.११ जून २०२४ रोजीच्या सुनावणीत, केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलजीवन मिशन योजनेतून निधीची तरतूद करण्यात यावी असे आदेशीत केले होते. तसेच गरज पडल्यास राज्य शासन, जिल्हा नियोजन समितीचा निधी व खासदार आणि आमदार फंडातून निधीची तरतूद करण्याचे आदेश दिले होते. याबाबत २९ जुलै २०२४ रोजी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान सदरील बैठक अचानक रद्द करण्यात आली. परंतु या महत्त्वाच्या विषयावर सय्यद सलीम यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे बीडचा पाणी प्रश्न मार्गी लागेल आणि याचे श्रेय सय्यद सलीम आणि आ.संदीप क्षीरसागर यांना जाईल या भीतीने उच्च न्यायालयाच्या आदेशांना बगल देत बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या संदर्भात ३१ जुलै २०२४ रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे बैठक घेतली. यावेळी या विषयात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन या संदर्भात प्रस्ताव तयार करून केंद्रीय जलजीवन मिशन योजनेच्या, जलशक्ती मंत्रालयाकडे पाठवणे गरजेचे होते. परंतु याकामाचे श्रेय दुसर्यांना जाईल म्हणून या बैठकीत हा विषय जाणीवपूर्वक इतरत्र वळविला गेला.

## कष्टकरी उपेक्षितांचा हुंकार अण्णाभाऊंनी साहित्यातून मांडला. !नगरसेवक ॲड विकास जोगदंड

बीड (प्रतिनिधी)

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठेनीं लिहिलेल्या कादंबऱ्या वास्तविक इतिहास आहे. त्यांनी जे पाहिले, तेच त्यांनी मांडले. वंचित उपेक्षितांचा स्वाभिमानी संघर्ष त्यांच्या लिखाणात दिसतो. म्हणुनच अण्णाभाऊंना ' कष्टकरी उपेक्षितांच्या साहित्याचे जनक' म्हणतात. सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहीरी करत त्यांनी आयुष्यभर वंचितांसाठी समाजप्रबोधन केले. जातीव्यवस्था आणि गरीबीमुळे ते शिक्षण घेऊ शकले नाही. मात्र अवघी दीड दिवसाची शाळा शिकुन अण्णाभाऊंनी साहित्य क्षेत्रात मात्र खूप मोठी झेप घेतली. कष्टकरी उपेक्षितांचे स्वाभिमानी आणि संघर्षमय जिवन त्याकाळी अगदी पोटतिडकीने आणि तळमळीने जगासमोर मांडणारा असा महालेखक दुसरा कोणी नव्हता. लेखणी आणि प्रतिभेच्या बळावर त्यांनी अनेक पुस्तके लिहीली. सिद्धहस्त कादंबरीकार, लोकशाहीर म्हणून त्यांना साहित्य क्षेत्रात आजही मानाचे स्थान आहे. त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला राज्य सरकारचा उत्कृष्ठ कादंबरीचा पुरस्कार मिळालेला आहे. यासोबतच त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. एवढंच नाही तर त्यांचे साहित्य चौदा भारतीय भाषा आणि इंग्रजी, जर्मन, रशियन अशा अनेक परदेशी भाषेतही प्रसिद्ध आहे. अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांमधून जनजागृतीचे कार्य केले. त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अत्यंत मोलाचे योगदान असून अन्यायाचा प्रतिकार करत संघर्ष करा असे सांगत जग बदलं घालूनी घाव.. सांगून गेले मला भिमराव असे ठणकावून सांगत आपल्या कथा-कादंबऱ्यातून शोषितांचा आक्रोश त्यांनी जगासमोर आणत कष्टकरी उपेक्षितांचा हुंकार आपल्या साहित्यातून अण्णा भाऊंनी मांडला असल्याचे प्रतिपादन भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/ अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी भिम स्वराज्य सेनेच्या विभागीय कार्यालयात जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना अभिवादन पर बोलतांना केले यावेळी



भिम स्वराज्य सेनेचे जिल्हा समन्वयक, मंगेश जोगदंड, सचिन जाधव,गोविंद वाघमारे, आदर्शराजे जोगदंड साहिल गायकवाड, महादेव वंजारे गोरख जोगदंड,हिरामण गायकवाड बाळू जावळे,अजय जोगदंड, चंद्रकांत जोगदंड,किसन (तात्या) जोगदंड, राजू जोगदंड,लखन शिंदे,उज्वल कोरडे सह आदी उपस्थित होते

## सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात बांधिलकी बांधणार युवा नेतृत्व अमर वाघमोडे

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील बहादरपूर येथील अमर पोपट वाघमोडे याचं पहिली ते चौथी पर्यंत प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळे मध्ये झालं. पाचवी ते दहावी अंबाजोगाई शहरात झालं नंतर महाविद्यालय शिक्षण माजलगाव या ठिकाणी व वैद्यकीय शिक्षण (डी फार्मसी )पाटोदा या ठिकाणी झाल, नंतर ते बीड शहरात आले, बीडमध्ये आल्यानंतर त्यांनी मेडिकल क्षेत्रात येण्याचा ठरवलं ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या ॲडमिशन संदर्भात बीड शहरात शिकायला आलेले विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींना सामोरे त्यांचे प्रश्न त्यांनी सोडवले बीड शहरातील डॉक्टर सोबत ओळख असल्याने, ग्रामीण भागातील रुग्णांच्या शहरातील सर्व हॉस्पिटल मध्ये पेशंटला ॲडमिट पासून सर्व येणाऱ्या अडचणी सोडवण्याचं काम सतत करत आहे,रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेकांना ब्लड कार्ड , सामाजिक कार्याच्या माध्यमातून देण्यात गेले आहेत.माहिती झाल्यावर किंवा कॉल केल्यावर तिथे भेट देतात.त्यांच्या अडीअडचणींना सातत्याने सामोरे जाण्याचे काम त्यांनी केलं आहे त्याचबरोबर सर्व जाती धर्माला सोबत घेऊन, मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा सुद्धा त्यांनी दिलेला आहे, सर्व समाजाच्या जाती धर्मांना सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्यामध्ये एक आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे,

महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या अत्यंत विश्वासू जवळचे आहेत, साहेबांच्या माध्यमातून अनेक कामे त्यांनी मार्गी लावले आहेत ,गोपीचंद पडळकर साहेब यांच्या अत्यंत जवळचे मानले जाणारे बीड जिल्ह्यामध्ये त्यांची ओळख आहे वैद्यकीय क्षेत्रामध्ये सातत्याने ते अग्रेसर असतात, सामाजिक कार्यामध्ये पण त्यांचा सक्रिय सहभाग असतो. धनगर समाजाला एसटी आरक्षण या प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात यावे यासाठी त्यांनी अनेक वेळा जिल्हाधिकारी यांना त्यांच्या शिष्टमंडळ मित्रपरिवारासोबत अनेकदा पाठपुरावा करून समाजाच्या प्रश्नासाठी ते खूप वेळ प्रश्न मांडण्यासाठी त्या ठिकाणी गेलेले आहेत , सामाजिक कार्यातून वैद्यकीय



क्षेत्रातून त्यांची बीड जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात ओळख आहे, बीड गेवराई याबरोबर त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात युवकांची फळी निर्माण केली आहे,



एम.पी.निमजे सेवा निवृत्त

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

येथील श्रीमती गोदावरी कुंकूलोळ कन्या नुतन विद्यालयातील जेष्ठ शिक्षिका एम.पी.निमजे ह्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवागौरव विद्यालयात संपन्न झाला. निमजे यांनी विद्यार्थिनींना तळमळीने अध्यापन केले असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.निमजे यांनीही सर्वांना भेटवस्तु देऊन स्वागत केले. या कार्यक्रमास निमजे परिवारातील सदस्य, शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी ता. केज जि. बीड संचालित गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर,बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. प्रमुख वक्ते श्री गदळे आर. ए. ,श्री तांदळे ए. ए. , श्री ठोकरे एम. व्ही. या मान्यवरांनी लोकमान्य टिळक आणि अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन केले.मान्यवरांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते छोटेखानी सत्कार समारंभ पार पडल्यानंतर शाळेचे विद्यार्थी वनवे कृष्णा, अमृता जाधव, शिंदे शरयू, सय्यद अश्मिरा, पवार तनुजा, आंधळे सृष्टी, शिंदे रुद्र, आडे आराध्या, सोनवणे श्रीनिवास, गिरी नारायण, स्वामी अनुजा, साठे भावेश, गदळे अनुष या विद्यार्थ्यांनी दोन्हीही समाजसुधारकांविषयी आपली उत्स्फूर्त मनोगते व्यक्त केली आणि उपस्थितांची मने जिंकून घेतली.



त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक श्री तांदळे सर यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी त्यांचे बालपण,शिक्षण तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान याबद्दल सखोल विवेचन केले. त्यानंतर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्याबद्दल तत्कालीन प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत तग धरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्वाचा वाटा उचलून,आपल्या साहित्यातून गरीब,शेतकरी,दलीत,कष्टकरी यांच्या व्यथा मांडून मराठी साहित्यास श्रीमंत केले.त्यांच्या जीवनातील कथा सांगत सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री गदळे सर यांनी स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीचा आढावा घेत दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा समन्वय साधत महापुरुषांनी समाजहितासाठी केलेल्या कामामुळे,त्यांच्या त्यागामुळे आपण त्यांच्यापासून प्रेरणा घेण्यासाठी या जयंती आणि पुण्यतिथी आयोजित करायला हव्यात असे वास्तवदर्शी विवेचन केले. विद्यार्थ्यांना संपूर्ण कार्यक्रमाचे नेमके आकलन कितपत झाले हे पाहण्यासाठी आपल्या अध्यक्षीय समारोपात शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रसंगोचीत प्रश्न विचारत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वसमावेशक आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. तेलप आर.बी. यांनी मानत मनोगते व्यक्त केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती डोंगरे यू.एम.यांनी केले

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT